सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी अभियानांतर्गत नाशिक स्मार्ट सिटीस **प्रशासकीय व कार्यालयीन खर्चाकरिता निधी वितरण (राज्य हिस्सा) ( रुपये १.२५ कोटी).**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्र. स्मार्टसि-०८२३/प्र.क्र.१५९/नवि-३२**
**मंत्रालय, मुंबई.**
**दिनांक : १३ ऑक्टोंबर, २०२३**

**संदर्भ :** (१) शासन निर्णय क्र. स्मार्टसि-२०१६/अनौस-५८/ प्र.क्र.२६१/न.वि. २३, दिनांक १८.०६.२०१६.
(२) शासन निर्णय क्र. स्मार्टसि.२०१६/प्र.क्र.५०३/न.वि. २३, दिनांक ०९.०१.२०१७.
(३) शासन निर्णय क्र. स्मार्टसि. २०१७/प्र.क्र.६१/न.वि. २३, दिनांक १०.०३.२०१७.
(४) शासन निर्णय क्र. स्मार्टसि. २०१७/प्र.क्र.२२०/न.वि. २३, दिनांक १८.०५.२०१७.
(५) शासन निर्णय क्र. स्मार्टसि. २०१७/प्र.क्र.२२०/न.वि. २३, दिनांक २२.१२.२०१७.
(६) शासन निर्णय क्र. स्मार्टसि. २०२०/प्र.क्र.१४८/न.वि. २३, दिनांक १४.०९.२०२०.
(७) गृहनिर्माण व शहरी विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून प्राप्त पत्र, दिनांक २३.०९.२०२२.
(८) शासन निर्णय क्र. स्मार्टसि. २०२२/प्र.क्र.२३२/न.वि. ३३, दिनांक २०.१०.२०२३.
(९) गृहनिर्माण व शहरी विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे दि. २८.०८.२०२३ चे दिनांक २९.०८.२०२३ रोजी प्राप्त पत्र.

**प्रस्तावना :-**

केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी अभियानांतर्गत निवडण्यात आलेल्या नाशिक या शहराकरीता, प्रशासकीय व कार्यालयीन खर्चाकरिता केंद्र शासनाच्या वितरीत केलेल्या निधीच्या प्रमाणात राज्य हिस्सा, रुपये १.२५ कोटी इतकी रक्कग वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासननिर्णय :-**

केंद्र शासन पुरस्कत स्मार्ट सिटी अभियानांतर्गत निवडण्यात आलेल्या नाशिक या शहरासाठी अभियानांतर्गत संदर्भाधीन क्र. ९ नुसार प्रशासकीय व कार्यालयीन खर्चाकरिता केंद्र शासनाने एकूण रु २.५ कोटी इतका निधी राज्य शासनास उपलब्ध केला आहे.

२. स्मार्ट सिटी अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार केंद्र शासनाच्या एकूण प्राप्त निधीच्या ५०% रक्कम म्हणजेच रुपये १.२५ कोटी इतका निधी संबंधित शहरास राज्य शासन हिस्सा निधी म्हणून वितरित करणे आवश्यक आहे. सदर स्मार्ट शहराकरीता खालीलप्रमाणे निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**(रूपये कोटीमध्ये)**

| अ. क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्था | जिल्हा | केंद्र शासनाने वितरीत केलेला केंद्र हिस्सा निधी | | केंद्र हिश्याच्या प्रमाणात सध्या वितरीत करावयाचा राज्य हिस्सा निधी |
|---|---|---|---|---|---|
| | | | निधी | उद्देश | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | **नाशिक** | **नाशिक** | २.५ | **प्रशासकीय व कार्यालयीन खर्चाकरिता निधी** | १.२५ |
| | **एकूण** | | **२.५** | | **१.२५** |

३. सदर निधी वितरणासाठी **जिल्हाधिकारी, नाशिक यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे**. जिल्हाधिकारी कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर निधीबाबतचे देयक कोषागार सादर करून स्मार्ट सिटी अभियान राबविण्याकरीता स्थापन करण्यात आलेल्या संबंधित शहराच्या विशेष उद्देश वाहनाच्या नावाने उपरोक्त विवरण पत्रामध्ये दर्शविल्या नुसार विहित कार्यपद्धतीनुसार तात्काळ वितरीत करणेबाबत आवश्यक कार्यवाही करून याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करावा. उपरोक्त अनुदानाचा वापर करण्याची मान्यता खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येतआहे.

४. उपरोक्त अनुदानाचा वापर करण्याची मान्यता खालील अटींच्या अधिन राहुन देण्यात येत आहे.

अ) उक्त निधी जिल्हाधिकारी, नाशिक यांनी नाशिक म्युनिसिपल स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांना आदेश मिळाल्यापासून तात्काळ वितरीत करणे आवश्यक राहील.

ब) शासन निर्णय दिनांक १८.०६.२०१६ मधील नमुद अटींची पुर्तता केल्यानंतरच नाशिक म्युनिसिपल स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांना सदर निधी वापरता येईल. तसेच उक्त अटींची पूर्तता करण्याची व सदर निधी अटींची पूर्तता झाल्यानंतरच वापरण्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत महापालिकेचे आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, विशेष उद्देश वाहन (एस.पी.व्ही.) यांची संयुक्तीकपणे राहील.

क) सदर निधीचा प्रकल्पाव्यतिरीक्त इतर बाबींवरील खर्चासाठी वापरता येणार नाही व तसे झाल्यास ही आर्थिक अनियमितता मानली जाईल अशा अनियमिततेसाठी संबंधीत महानगरपालिका आयुक्त पूर्णपणे जबाबदार राहतील.

ड) सदर निधीचा विनियोग ज्या कारणासाठी निधी मंजूर केला आहे त्याच कारणासाठी करण्यात यावा. सदर निधी खर्च झाल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र, तसेच प्रकल्पाचे उद्दीष्ट व साध्य याची माहिती केंद्र शासनाने विहित केल्याप्रमाणे सादर करणे बंधनकारक राहील.

इ) सदर शासन निर्णयान्वये प्राप्त निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहीत नमुन्यात उपलब्ध करून संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी नियंत्रक अधिकारी या नात्याने संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

ई) संबंधीत स्मार्ट शहराच्या महानगरपालीकेने ५०:२५:२५ (केंद्र:राज्य:नागरी स्थानिक स्वराज्य संस्था) या सूत्राप्रमाणे त्यांच्या हिश्श्याची रक्कम विशेष उद्देश वहनाच्या बँक खात्यात तात्काळ जमा करणे बंधनकारक राहील. याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधीत महानगरपालिकेच्या आयुक्तांची राहील.

५. उपरोक्त विवरण पत्रामध्ये नमुद रुपये १,२५,००,०००/- (रुपये एक कोटी पंचवीस लाख फक्त) इतक्या रकमेचा खर्च हा नगर विकास विभाग - मागणी क्र.एफ - २, २२१७ - नगर विकास, ८० - सर्वसाधारण, १९१- स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिका, नागरी विकास प्राधिकरणे, शहर सुधारणा मंडळे इत्यादींना सहाय्य, विशेष उद्देश वहनाचा प्रशासकीय व कार्यालयीन खर्चाकरिता एकूण राज्य हिश्श्याच्या ५% सहाय्य **(२२१७ A६९१), ३१ सहाय्यक अनुदाने, (वेतनेतर), दत्तमत,** या लेखाशिर्षामधून सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय हा वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं- २०२३/ प्र.क्र.४०/ अर्थ-३, दि. १२ एप्रिल, २०२३ या शासन परिपत्रकातील सर्व बाबींची प्रतिपूर्ती होत असल्याबाबत विभागाने तपासून घेतले आहे.

७.  सदर शासन निर्णय हा वित्त विभागाच्या परिपत्रक क्र. अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक १२ एप्रिल, २०२३ अन्वये सर्व बाबींची पूर्तता होत असल्याने व वित्त विभागाच्या त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३५६/व्यय-३, दि. ०९.१०.२०२३ अन्वये दिलेल्या सहमतीने व सदर निधी वितरणासाठी प्रशासकीय विभागास प्राप्त झालेल्या अधिकारांच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे. सदर अनुदान सशर्त वितरीत करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

**(श्रीकांत आंडगे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत :

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. विरोधी पक्ष नेते महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव.
५. मा. विरोधी पक्ष नेते महाराष्ट्र विधान परिषद यांचे खाजगी सचिव.
६. मा. मंत्री वित्त व नियोजन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य , मंत्रालय, मुंबई.
८. अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग , मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९.प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. प्रधान सचिव नगर विकास विभाग-१, मंत्रालय, मुंबई.
११. प्रधान सचिव नगर विकास विभाग-२, मंत्रालय, मुंबई.
१२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता)-१, मुंबई.
१४. महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता)-२, पुणे.
१५. विभागीय आयुक्त, नाशिक.
१६. जिल्हाधिकारी, नाशिक.
१७.आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक.
१८. मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक म्युनिसिपल स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि.
१९. जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक.
२०. जिल्हा प्रशासन अधिकारी, नाशिक.
२१. निवडनस्ती नवि-३२.